मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
www.newsexpressmarathi.com
» पुणे, पिंपरी-चिंचवड
» बुधवार, दि. 9 एप्रिल 2025 | पान- 1

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

# माउलींच्या पालखीचे 19 जूनला प्रस्थान

## आळंदीहून पंढरपूरकडे प्रस्थान : 5 जुलैला होणार पंढरपुरात दाखल; दिंडी समाज बैठकीत मुक्काम

**पिंपरी | प्रतिनिधी**

आषाढी वारीसाठी संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा यंदा १९ जून रोजी आळंदीहून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. सोहळा पाच जुलै रोजी पंढरपुरात पोहोचणार आहे. दरम्यान, यंदा प्रस्थानला गुरुवार आल्याने दर गुरुवारी होणारी पालखीची मंदिर प्रदक्षिणा झाल्यानंतर म्हणजे रात्री आठ वाजता मुख्य प्रस्थान सोहळा सुरू होणार आहे, अशी माहिती प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ यांनी दिली. दरम्यान, पालखी मार्गावर लोणंद येथे दोन दिवसांच्या मुक्कामांबाबतचा निर्णय प्रलंबित असल्याने अंतिम वेळापत्रकासाठी वारकऱ्यांना प्रतीक्षा करावी लागणार आहे.




आळंदी देवस्थानचे विश्वस्त आणि दिंडी समाज संघटना यांची बैठक सोमवारी (ता. ७) पंढरपुरात पालखी सोहळा मालक बाळासाहेब आरफळकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी पालखी सोहळा प्रमुख डॉ. भावार्थ देखणे, प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ, विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप, रामभाऊ चोपदार, बाळासाहेब चोपदार, विठ्ठल महाराज वासकर, नामदेव महाराज वासकर, माउली महाराज जळगावकर, भाऊसाहेब महाराज गोसावी, मारुती महाराज कोकाटे, भाऊ महाराज फुरसुंगीकर आणि दिंडीकरी-फडकरी यांची उपस्थिती होती.

याबाबत योगी निरंजननाथ म्हणाले, "संत ज्ञानेश्वर माउलींचा पालखी सोहळ्याचे १९ जूनला आळंदीच्या देऊळवाड्यातून प्रस्थान होणार आहे. प्रस्थानाच्या दिवशी गुरुवार आल्याने दर गुरुवारची पालखी प्रदक्षिणा झाल्यानंतर पालखीचे रात्री आठनंतर प्रस्थान सोहळा सुरू होईल. पहिला मुक्काम आळंदीतच नवीन दर्शन मंडपात होईल. बैठकीतील चर्चेनुसार लोणंदमध्ये यंदा एक मुक्काम होता. मात्र, दरवर्षीप्रमाणे दोन दिवसांचा मुक्काम असावा, अशी दिंडीप्रमुखांची मागणी होती. त्यावर अद्याप निर्णय झाला नाही. येत्या दोन दिवसांत आळंदी देवस्थानकडून यापूर्वीचा मुक्काम बदलाबाबतचा संदर्भ पाहून पुढील दोन दिवसांत पालखी प्रस्थान आणि मार्गावरील मुक्कामाचे वेळापत्रक जाहीर केले जाईल. सोहळ्यात परंपरेप्रमाणे तीन उभे रिंगण आणि चार गोल रिंगण सोहळे होणार आहेत. दरम्यान, सोहळा पंढरपुरात ५ जुलैला पोचेल. आषाढी एकादशी ६ जुलै रोजी आहे."

### 'व्यासपीठ अन् ध्वनीक्षेपकावर बंदी घालावी'

» आळंदी-पंढरपूर पालखी मार्गावर ठिकठिकाणी वारकऱ्यांच्या स्वागतासाठी व्यासपीठ उभारून मोठ्या आवाजात ध्वनिक्षेपक लावले जातात. त्यामुळे दिंडीतून पायी चालणाऱ्या वारकऱ्यांना भजनात व्यत्यय येतो. यामुळे व्यासपीठ आणि ध्वनिक्षेपकावर बंदी घालण्याबाबत सरकारला सूचना केली जाणार आहे. याबाबत बैठकीत चर्चा झाली.

# महापालिका आयटीआय विद्यार्थ्यांना आता विद्यावेतन!

## भाजपा आमदार लांडगे यांच्या मागणीला यश : महानगरपालिका प्रशासनाचा निर्णय

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका संचालित आयटीआय (औद्योगिक प्रशिक्षण संस्था ) मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय आयटीआयमधील विद्यार्थ्यांप्रमाणे विद्यावेतन लागू करण्याच्या प्रस्तावाला महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली आहे.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या सर्व प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून दरमहा ५०० रुपये इतके विद्यावेतन देण्यात यावे, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली होती. त्याअनुशंगाने महानगरपालिका प्रशासनाने कार्यवाही केली आहे.

दरम्यान, महानगरपालिका प्रशासनाने राज्य शासनाच्या धर्तीवर मनपा आयटीआयच्या विद्यार्थ्यांनाही ५०० रुपये इतके विद्यावेतन द्यावे, असा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठवला होता. मात्र, सदर प्रशिक्षण केवळ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत असलेल्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांनाच योजना लागू करता



येईल. त्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा, असे कळवले होते.

त्यानुसार, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन देण्याबाबत आयुक्तांनी मान्यता दिली. दरवर्षी सुमारे ९०० प्रशिक्षणार्थ्यांचे ५०० रुपये प्रमाणे ४ लाख ५० हजार रुपये प्रतिमहिना खर्च महानगरपालिका स्तरावर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, या पुढील काळात आयटीआयमध्ये ट्रेड वाढल्यास त्या विद्यार्थ्यांनाही विद्यावेतन देय राहील, असे धोरण ठरवण्यात आले आहे.

> “ राज्याच्या कानाकोपऱ्यातून नोकरी व व्यावसायाच्या निमित्ताने शहरात वास्तव्यास आलेल्या कुटुंबातील मुलांना महानगरपालिका आयटीआय संस्थेच्या माध्यमातून कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकतेची संधी उपलब्ध होती. सर्वसामान्य कुटुंबातील या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे आणि शहरातील औद्योगिक कंपन्यांमध्ये कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे. या अनुशंगाने राज्य शासनाच्या धर्तीवर मनपा आयटीआयच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन मिळावे, अशी मागणी केली होती. त्याला प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यामुळे प्रतिवर्षी सुमारे ९०० विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होणार आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.**

# तातडीच्या उपचारासाठी अनामत रक्कम घेऊ नका

## पुणे महापालिकेची सर्व रुग्णालयांना नोटीस : 860 रुग्णालयांना पाठवली नोटीस

**पुणे | प्रतिनिधी**

तातडीच्या उपचाराची गरज असलेल्या रुग्णांच्या नातेवाइकांना अनामत रक्कम भरण्याची सक्ती करू नका, अशा स्वरूपाची नोटीस महापालिकेच्या आरोग्य विभागाने शहरातील सर्व खासगी रुग्णालयांना काढली आहे. अनामत रकमेसाठी अडवणूक केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित रुग्णालयावर कारवाई करण्याचा इशारादेखील आरोग्य विभागाने दिला आहे.



दहा लाखांची अनामत रक्कम भरली नाही म्हणून दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने गर्भवती महिलेवर उपचार नाकारले. त्यानंतर उशिरा उपचार मिळाल्याने गर्भवती महिलेचा मृत्यू झाला. पैशांमुळे रुग्णाचा जीव गेल्यामुळे रुग्णालयाविरोधात चांगलेच वातावरण पेटले आहे. राजकीय पक्षांकडून तसेच सामाजिक संघटना, संस्था, पुणेकरांकडून रुग्णालयाविरोधात संताप व्यक्त केला जाऊ लागला आहे.

या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या आरोग्य विभागाने शहरातील सर्व ८६० खासगी रुग्णालयांना तातडीच्या उपचारासाठी अनामत रकमेचा हट्ट धरू नये. अशा प्रकारची नोटीस दिली जाणार असल्याची माहिती आरोग्य प्रमुख डॉ. नीना बोराडे यांनी दिली आहे. रुग्णालयांनी महापालिकेच्या आदेशाचे पालन न केल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

### या टोल फ्री क्रमांकावर करा तक्रार

» रुग्णालयांनी अनामत रक्कम भरण्याची सक्ती केल्यास किंवा वैद्यकीय नियमांचे पालन न केल्यास नातेवाइकांनी १८००२३३४१५१ या टोल फ्री क्रमांकावर तक्रार करावी, असे आवाहन महापालिकेच्या आरोग्य विभागाने केले आहे.

### 89 रुग्णालयांवर आरोग्य विभागाने केली कारवाई

» राज्य शासनाच्या आरोग्य विभागाने दिलेल्या आदेशानुसार, शहरातील रुग्णालयांची तपासणी पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून केली आहे. त्यानुसार शहरातील ८६० रुग्णालयांची तपासणी केली. या तपासणीत दर्जेदार सेवा, रुग्णांना सेवा मिळण्यास काही अडचणी आहेत का? या पाहणीसह रुग्ण हक्क संहिता, दरपत्रक लावणे, टोल फ्री क्रमांक लावला आहे का? याची तपासणी केली जाते. या तपासणी मोहिमेदरम्यान ८९ रुग्णालयांमध्ये त्रुटी आढळून आल्याने या प्रकरणी पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाने रुग्णालयांना नोटीस दिली आहे.

# महापालिकेच्या ताफ्यात 11 नवीन 'जेसीबी'

## 14 जून्या भूमी उत्खनक यंत्रांची विक्री करून आलेल्या पैशातून नवीन यंत्रांची केली खरेदी

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या विविध विभागातील कामे करण्यासाठी अनेक वेळा खासगी ठेकेदारांची भूमी उत्खनक यंत्रे ( बॅकहों लोडर) वापरले जातात. यापोटी महापालिकेकडून ठेकेदाराला भाडे दिले जाते. मात्र आता महापालिकेने नुकत्याच ४७३ जून्या वाहनांचा लिलाव केला, त्यात १४ जून्या भूमी उत्खनक यंत्रांची विक्री केली. त्यातून मिळालेल्या पैशांतू महापालिकेने ११ नवीन मशीन खरेदी केल्या आहेत.



महापालिकेची ही कृती लहान असली तरी पुणेकरांनी याचे स्वागत केले आहे. आता तरी महापालिकेने स्वत:च्या मशीन असताना ठेकेदारांच्या मशीन भाडे तत्वावर घेवून आमच्या कराचे पैसे ठेकेदारांच्या घशात घालू नये, अशी सल्लावजा मागणीही नागरिकांनी केली आहे.

देशातील जुनी वाहने भंगारात काढण्यासाठी सरकारने नुकतेच नवीन 'वाहन स्क्रॅप धोरण' लागू झाले आहे. या धोरणानुसार १५ वर्षपिक्षा जुन्या गाड्यांची पूर्ननोंदणी आरटीओ कार्यालयाने नोंदणी बंद केली आहे. त्यामुळे महापालिकेच्या मालकीच्या ४७३ गाड्यांचा लिलाव करण्यात करण्यात आला. या वाहनांमध्ये जून्या भूमी उत्खनक यंत्र या मशीनचादेखील समावेश होता. महापालिकेची सातत्याने विविक विकास कामे सुरु आहेत. या विकासकामांसाठी खासगी ठेकेदारांच्या मशीन वापरण्याला प्राधान्य दिले जात असल्याचे दिसून येते. स्थानिक राजकारणी, राजकीय कार्यकर्ते तसेच माजी नगरसेवकांच्या निकटवर्तीयांच्या या मशीन असतात. ते मशीन महापालिकेच्या कामांमध्ये भाडे तत्वावर लावले जाते. यातून पुणेकरांचा पैसा त्यांच्या घशात घातला जातो.

अनेक वेळी अधिकारी आणि ठेकेदार मिळून महापालिकेचे मशीन असतानादेखील भाड्याने मशीन घेण्याचा आग्रह धरतात. यातून मिलीभगत साधली जाऊन आर्थिक मलिदा लाटला जातो. त्यामुळे आता महापालिकेने नवीन ११ मशीन विकत घेतले आहेत. हे मशीन विकत घेण्यासाठी महापालिकेने रितसर टेंडर प्रक्रिया राबविली होती. या मशीनसाठी एकूण साडेतीन कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे, अशी माहिती महापालिकेचे वाहन विभागाने दिली.

जी वाहने केंद्र किंवा राज्य सरकारच्या चलनातून बाहेर काढली जातील किंवा जी अतिरिक्त आहेत किंवा दुरुस्त केली जाऊ शकत नाहीत, ती नोंदणीकृत वाहन स्क्रॅपिंग फॅसिलिटीकडे स्क्रॅपिंगसाठी पाठवली जातील. या व्यतिरिक्त कोणत्याही वाहनांचा लिलाव, जप्त किंवा हक्क नसलेली वाहने नोंदणीकृत वाहन स्क्रॅपिंग फॅसिलिटीवर वाहनांना स्क्रॅप केले जाईल, याचे नियम निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार महापालिकेची ४७३ वाहनांची नोंदणी रद्द करण्यात आली, अशी माहिती मोटार वाहन विभागाचे प्रमुख जयंत भोसेकर यांनी दिली.

### 473 वाहनांच्या लिलावातून मिळाले 6.88 कोटी रुपये

» केंद्र सरकारच्या वाहन स्क्रॅप धोरणानुसार महापालिकेच्या १५ वर्षे पेक्षा जुन्या गाड्यांची नोंदणी आरटीओने रद्द केल्या आहेत. हे धोरण लागू होण्यापूर्वी महापालिकेकडून २४ ते २५ वर्षांपर्यंत गाड्या वापरात आणल्या जात होत्या. त्यामुळे वाहने रस्त्यात बंद पडणे, गाड्यांचा पार्ट तुटणे असे प्रकार घडत होते. नवीन गाड्या घेण्यासाठी केली जाणारी दिरंगाई यामुळे महापालिकेच्या मोटार वाहन विभागाला या गाड्या दुरुस्त करून वापरण्याची वेळ येत होती. परंतु आता केंद्राच्या धोरणानुसार महापालिकेच्या विविध विभागातील एकूण ४७३ गाड्यांचा लिलाव महापालिकेच्या नेमलेल्या समितीने निर्णय घेतला होता. या समितीने या वाहनांच्या लिलावातून ६ कोटी ३३ लाख रुपये मिळतील, असे सांगितले होते. प्रत्यक्षात एकूण ४७३ वाहनांचा लिलाव केल्यानंतर महापालिकेला ५५ लाख रुपये अधिकचे मिळाले असून एकूण ६ कोटी ८८ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले.

# डायलिसिस रुग्णांसाठी नवीन थेरगाव रुग्णालय वरदान

## मार्च 2025 पर्यंत सदर विभागात एकूण 10 हजार रुग्णांचे डायलिसिस यशस्वीरीत्या पूर्ण

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नवीन थेरगाव रुग्णालयात ऑक्टोबर २०२२ मध्ये डायलिसिस विभाग सुरू करण्यात आला. ३१ मार्च २०२५ पर्यंत सदर विभागात एकूण १० हजार रुग्णांचे डायलिसिस यशस्वीरीत्या पूर्ण झाले. ही उपचारसेवा महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत (एमजेपीजेएवाय) पूर्णपणे विनामूल्य राबवण्यात येत आहे. यामुळे गंभीर किडनी आजाराने ग्रस्त हजारो रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे.



> पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने नागरिकांच्या आरोग्यासाठी विविध योजना प्रभावीपणे राबवल्या जात आहेत. डायलिसिस सेवा ही त्यातील एक महत्त्वाची आणि जीवनदायी सुविधा आहे. मोफत उपचारामुळे अनेक गरजू रुग्णांना दिलासा मिळत असून, भविष्यात या सेवेचा विस्तार ही आमची प्राथमिकता असेल.
>
> **- डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

नवीन थेरगाव रुग्णालयात ९ डायलिसीस यंत्रे कार्यरत आहेत. नजीकच्या काळात ह.भ.प. प्रभाकर मल्हारराव कुटे मेमोरियल रुग्णालय, आकुर्डी, तालेरा रुग्णालय, जिजामाता रुग्णालय आणि नवीन भोसरी रुग्णालय येथे डायलिसिस विभाग सुरु करण्यात येणार आहे. नवीन थेरगाव रुग्णालयाचे रुग्णालय प्रमुख डॉ. राजेंद्र फिरके यांच्या मार्गदर्शनाखाली डायलिसिस विभागाचे प्रमुख म्हणून डॉ. लक्ष्मीकांत अत्रे हे कामकाज पाहत आहेत.

# तळेगावचा ऐतिहासिक तलाव होणार जलपर्णीमुक्त

## ड्रोनच्या सहाय्याने कीटकनाशकांची फवारणी सुरु : स्थानिक रोजगाराला मिळणार चालना

**पिंपरी | प्रतिनिधी**

तळेगाव दाभाडे (ता. मावळ) येथील ऐतिहासिक तलाव जलपर्णीमुळे पूर्णपणे झाकला गेला होता. या वाढत्या जलपर्णीने तलावातील जलजीवांचे जीवन धोक्यात आले होते. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी तळेगाव दाभाडे नगरपरिषद आणि मावळ तालुका मत्स्य संघ यांनी संयुक्तपणे पुढाकार घेतला आहे. विशेष म्हणजे या कामासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत, ड्रोनच्या सहाय्याने सेंद्रिय कीटकनाशकांची फवारणी सुरू करण्यात आली आहे.



तळेगाव दाभाडे हे दाभाडे घराण्याचे ऐतिहासिक ठिकाण आहे, जिथे सरसेनापती ऊमाबाई दाभाडे आणि खंडेराव दाभाडे यांच्या समाध्या आहेत. या परिसरातील तलाव पर्यटकांसाठी एक प्रमुख आकर्षण आहे. याशिवाय, इथे पांडवांचे मंदिर, बनेश्वर मंदिर आणि बामणडोह विहीरदेखील आहे. या तळ्यात उतरण्यासाठी चारही बाजूंनी पायऱ्या बांधलेल्या दिसतात. परंतु नंतरच्या काळात यातले पाणी वापरण्याजोगे न राहिल्याने तळ्याला 'नासके तळे' असेही म्हटले जाऊ लागले.

सध्या सुमारे ४० एकर परिसरात असलेल्या या तलावाच्या ३२ एकर भागात पाणी आहे. जलपर्णीमुळे तलावाचा नैसर्गिक प्रवाह अडवला जात होता, तसेच मत्स्यपालनावरही परिणाम होत होता. नागरिकांच्या सततच्या तक्रारींनंतर नगरपरिषदेकडून राज्याच्या विपणन महामंडळाकडे जलपर्णी काढण्याची परवानगी मागण्यात आली. परवानगी मिळताच भोई समाज, मत्स्य संघ आणि नगरपरिषदेचे कर्मचारी यांनी मिळून ही मोहीम राबवायला सुरुवात केली.

या मोहिमेत नैसर्गिक आणि सेंद्रिय कीटकनाशकांचा वापर केला जात असून, नीम अर्क आणि साइट्रेटपासून तयार केलेल्या फवारणीमुळे जलपर्णीतील क्लोरोफिल पेशी नष्ट होतात. त्यामुळे जलपर्णीची वाढ थांबते आणि ती आपोआप सुकून नष्ट होते. या सेंद्रिय फवारणीचा जलजीव, प्राणी आणि माणसांवर कोणताही दुष्परिणाम होत नाही, असे नगरपरिषदेने स्पष्ट केले आहे. ही फवारणी सहा टप्प्यांत केली जाणार असून, त्यानंतर तलावातील पाणी बायोरिमेडिएशनच्या माध्यमातून शुद्ध करण्याची योजना आहे. यासाठी एरेटर, फ्लोटिंग आयलंड्स, बायो कल्चर डोजर आणि एरिएशन फाउंटन बसवण्याची तयारी सुरू आहे. या उपायांमुळे पाण्याची गुणवत्ता सुधारेल आणि जैवविविधतेलाही चालना मिळेल.

> जलपर्णी हटवण्याच्या प्राथमिक टप्प्याला सुरुवात झाली असून, पुढच्या टप्प्यात पाण्याचे शुद्धीकरण बायोरिमेडिएशन तंत्रज्ञानाने केले जाईल. यामुळे तलावाचे सौंदर्य वाढेल आणि पर्यावरणीय समतोल राखला जाईल.
>
> **- विजयकुमार सरनाईक, मुख्याधिकारी, तळेगाव दाभाडे नगरपरिषद.**

### जलपर्णी म्हणजे काय?

**» वॉटर हायसिंथ (जलपर्णी अथवा जलकुंभी) ही ऍमेझॉन बेसिनमधील एक मोठी जलचर वनस्पती आहे. त्याची जाड, मेणासारखी, अंडाकृती आकाराची पाने ४ ते ८ इंचाची असतात. या वनस्पतीच्या मध्यभागापासून सुधारित देठांवर फांद्या फुटतात ज्या पाण्याच्या पृष्ठभागापासून १ मीटर उंचाची असू शकतात. वॉटर-हायसिंथ मॅट्समुळे विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण कमी होते, ज्यामुळे माशांच्या संख्येवर परिणाम होतो . एक एकर वॉटर-हायसिंथ दरवर्षी जलमार्गाच्या तळाशी ५०० टन कुजणारे वनस्पतीजन्य पदार्थ जमा करू शकते. वॉटर-हायसिंथ मॅट्समुळे धरणे तयार होऊन नद्या आणि कालव्यांमध्ये पूर येऊ शकतो.**

तलावातील जलपर्णी पूर्णपणे हटवल्यानंतर नगरपरिषद तलाव परिसरात उद्यान, फव्वारे, बोटींग आणि इतर पर्यटन सुविधांचा विकास करण्याचा विचार करत आहे. यामुळे स्थानिक नागरिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि तळेगावच्या अर्थव्यवस्थेला हातभार लागेल. याचसोबत स्वच्छ पाण्याचा साठा वाढेल आणि तो शेतीसाठी उपयोगात आणता येईल. या संपूर्ण उपक्रमाला आमदार सुनील शेळके यांचा सक्रिय पाठिंबा असून, त्यांनी यासारखीच योजना पवना आणि इंद्रायणी नद्यांसाठीही राबवण्याचे संकेत दिले आहेत.

# बेशिस्त चालकांवर आता कारवाईचा बडगा

## गैरवर्तणूक आढळल्यास चालक आणि वाहकांवर कारवाई करण्याचा इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएमएल) बेशिस्त बसचालक आणि वाहकांवर कारवाई करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असून, त्यायाबाबत सोमवारी परिपत्रक काढण्यात आले.

परिपत्रकात म्हटले आहे, “पीएमपीएमएल’च्या स्वत:च्या आणि कंत्राटी बसचालकांना बसमध्ये मोबाईल किंवा इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरता येणार नाहीत. भरधाव बस चालविणाऱ्या चालकांवर नियंत्रण ठेवण्याबाबत सूचना करण्यात आली आहे. गैरवर्तणूक आढळल्यास चालक आणि वाहकांवर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.



पुण्यात आयोजित एका कार्यक्रमात नागरिकांनी ‘पीएमपी’च्या अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक दीपा मुधोळ- मुंडे यांच्यावर प्रश्नांचा भडिमार केला होता. ‘पीएमपी’च्या तक्रार केंद्रावर ऑनलाईन अर्ज केल्यानंतरही कारवाई होत नसल्याचे मांडण्यात आले होते.

### चालक-वाहकांसाठी या सूचना

बस संचलन करताना मोबाईल किंवा इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा (हेडफोन) वापर करू नये

मद्यपान किंवा धूम्रपान करू नये

वाहतूक नियंत्रण दिवा (लाल) लागल्यास बस चिन्हांकित पट्ट्याच्या (झेब्रा क्रॉसिंग) मागे थांबवावी.

मार्गिकेवरील बस थांब्यांवरच बस उभ्या कराव्यात

मार्गिका शिस्तीचे पालन करावे

बस भरधाव चालवू नये

### कंत्राटी बसचालकांना सूचना

» ‘पीएमपी’कडे चार हजार ९२८ चालक आहेत. यापैकी दोन हजार ६८२ बसचालक पीएमपीचे, तर दोन हजार २४९ चालक हे कंत्राटी (ठेकेदार) आहेत. पीएमपी प्रशासनासह कंत्राटी चालकांनाही या सूचना लागू राहणार असल्याचे यावेळी ‘पीएमपी’तील अधिकाऱ्यांकडून स्पष्ट करण्यात आले.

“ बस वेगात चालविल्याने बसमधील प्रवाशांसह रस्त्यावरील नागरिकांना धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच, वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणे चुकीचे आहे. त्यामुळे शिस्त लावण्यासाठी कारवाईचा बडगा उगारणे महत्त्वाचे आहे.

**- दीपा मुधोळ-मुंडे,**
**अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल.**

# रुग्णालयाकडून थकीत मिळकतकर वसूल करा

## ‘दीनानाथ’बाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळेंची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

‘पुणे महापालिकेच्या मिळकतकराची काही हजार रुपयांची थकबाकी न भरणाऱ्या नागरिकांच्या घरासमोर महापालिका वसुलीसाठी बँड वाजवते. मग २७ कोटी रुपयांचा मिळकतकर थकविणाऱ्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयासमोर महापालिकेने बँड का वाजवला नाही,’ असा सवाल खासदार सुप्रिया सुळे यांनी सोमवारी केला. महापालिकेने ४८ तासांत थकीत मिळकतकराबाबत निर्णय न घेतल्यास महापालिकेत आंदोलन करण्याचा इशारा खासदार सुळे यांनी दिला.



बारामती लोकसभा मतदारसंघातील महापालिकेच्या प्रश्नांबाबत चर्चा करण्यासाठी खासदार सुळे यांनी सोमवारी महापालिका अधिकाऱ्यांची बैठक घेतली. बैठकीनंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या, ‘सामान्य नागरिकांनी १० हजार ते २० हजारांचा मिळकतकर थकविला, तर महापालिका घरासमोर बँड वाजविते. मग कोट्यवधींचा मिळकतकर थकविणाऱ्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला वेगळा न्याय का?’

‘गर्भवतीला रुग्णालयात साडेपाच तास बसवून ठेवले आणि १० लाख रुपयांची मागणी केल्याचे चौकशी समितीच्या अहवालामधून समोर आले आहे. या महिलेच्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्या प्रत्येकावर कठोर कारवाई झालीच पाहिजे,’ अशीही मागणी सुळे यांनी केली.

दरम्यान, रुग्णालयाकडून थकीत मिळकतकर वसूल करण्याच्या मागणीचे निवेदन महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या वतीने देण्यात आले. या वेळी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस रोहन सुरवसे पाटील, विद्यार्थी काँग्रेसचे सरचिटणीस कृष्णा साठे, दीपक चौगुले, ज्ञानेश्वर जाधव, कुलदीप नाईकनवरे, देवेंद्र खाटीर, बाबा मिसाळ, सुनील कुसाळकर, हृषीकेश आंधळे आदी उपस्थित होते.

### महापालिका नोटीस बजावविणार

» दीनानाथ मंगेशकर रुग्णालय हे धर्मादाय असल्याने मिळकतकरात सवलत द्यावी, अशी मागणी रुग्णालयाने करून महापालिकेच्या विरोधात न्यायालयात दावा दाखल केला आहे. त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही. मिळकतकर भरण्याच्या सूचना रुग्णालयाला वेळोवेळी देण्यात आल्या आहेत. २०१७ पासून २०२५ पर्यंत रुग्णालयाने १५ कोटींचा कर भरला आहे. मात्र, अद्यापही २० ते २२ कोटी रुपयांचा कर रुग्णालयाकडे थकीत असल्याचे मिळकतकर विभागाच्या उपायुक्त प्रतिभा पाटील यांनी सांगितले. मिळकतकर भरावा, यासाठी रुग्णालयाला नोटीस दिली जाणार असल्याचे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले.